## मध्यवर्ती प्रात्याक्षिक प्रक्षेत्र, डॉ. पं.दे.कृ.वि., वणी रंभापूर

**लिलावा बाबत सुचना तसेच अटी व शर्ती**

**विषय: मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर अंतर्गत निरुपोयोगी जड़वस्तू व किरकोळ विविध साहित्याची विक्री करिता मोहर बंद दर पत्रक सादर करणे बाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संबंधित सहभागी होणाऱ्या लिलाव धारकास कळविण्यात येते की, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर अंतर्गत येत असलेल्या विविध १९ विभागावरील विविध प्रकारच्या निर्लेखित केलेल्या निरुपयोगी जडवस्तूची खालील अटी व शर्ती च्या अधीन राहून '**बंद लिफाफा**' लिलाव पद्धतीद्वारे विक्री करणे आहे. तरी इच्छुक लिलावधारकानी आपले दर पत्रक मोहर बंद लिफाफ्यात **दिनांक १७/०३/२०२६ ते २३/०३/२०२६ रोजी संध्या. ५:३० वाजेपर्यत** मुख्य बिजोत्पादन अधिकारी, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापुर या नावाने मध्यवर्ती प्रात्येक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापुर या कार्यालयात सादर करावे. अंतिम दिनांका नंतर येणाऱ्या दर पत्रकांचा कुठल्याही प्रकारचा विचार करण्यात येणार नाही. प्राप्त दर पत्रक बंद लिफाफा **दि. २४/०३/२०२६ रोजी सकाळी ११.००** वाजता सर्व सहभागी लिलावधारक व समिती समक्ष उघडण्यात येतील. त्याकरिता दर पत्रक सादर केलेल्या संबंधित लिलावधारकाची या कार्यालयात नमुद वेळेत (दि. २४.०३.२०२६ रोजी) **रु. १००,०००/-** (रुपये एक लाख) रकमेचा **डिमांड ड्राफ्ट** घेऊन स्वखर्चाने उपस्थित राहणे अनिवार्य आहे. जे दर पत्रक सादर करणारे लिलावधारक हजर राहणार नाहीत त्यांची कोणतीच तक्रार नंतर विचारात घेतली जाणार नाही. सदर प्रक्रीया बाबत सविस्तर अटी व शर्ती खालील प्रमाणे दिलेले आहे. तरी दर पत्रक भरण्यापूर्वी सर्व खाली दिलेल्या अटी व शर्तीचे अवलोकन करावे.

१) दर पत्रक बंद लिफाफ्यात **दि. २३/३/२०२६ रोजी संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत** मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापुर या कार्यालयात सादर करावे. त्यानंतर येणारे दर पत्रकाचा विचार करण्यात येणार नाही. तत्पूर्वी इच्छुक लिलावधारकांनी दर पत्रक भरण्यापूर्वी विभाग निहाय वस्तूची पाहणी २ ते ३ दिवसापूर्वी करावी. सदरील वस्तू/ साहित्य पाहणी करिता मुख्य कार्यालयाच्या परिसरात विभाग निहाय उपलब्ध राहतील.

२) लिफाफ्याच्या वरील बाजुस **"निरुपोयोगी जडसाता साहित्याची खरेदी करिता दर पत्रक"** असे नमूद करावे.

३) दर पत्रक सादर करणाऱ्या लिलाव धारकास **रु १००,००० /-** (एक लाख रुपये) अनामत रक्कमेचा **'डिमांड ड्राफ्ट'** लेखाधिकारी, म.प्रा.प्र., वणी रंभापूर यांच्या नावे बंद लिफाफ्यात न टाकता स्वतंत्र

डिमांड ड्राफ्ट मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापुर या कार्यालयात बंद लिफाफा उघडण्यापूर्वी समिती समक्ष जमा करावा नंतरच संबंधित दर पत्रक उघडण्यात येतील व लिलाव प्रक्रियेत भाग घेता येईल.

४) बंद लिफाफा लिलाव प्रक्रिया शुरु करत असतांना ज्या लिलावधारकाने प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी एक लाखाचा डी डी अनामत रक्कम म्हणून जमा केलेला आहे, अशाच लिलावधारकास सदर प्रक्रियेत सहभाग घेता येईल.

५) खरेदीदारास जडवस्तू व किरकोळ साठा पहावयाचा असल्यास दिनांक १७/०३/२०२६ ते २३/०३/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत स्वखर्चाने उपस्थित राहून पाहता येईल व पूर्ण पाहणी केल्या नंतर सोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्र-१ नुसार विभागनिहाय दर पत्रक बंद लिफाफा मध्ये सिलबंद करून कार्यालयात **दि.२३/०३/२०२६ (सायं. ५:३० पर्यंत)** जमा करावे. (प्रपत्र-१ विद्यापीठच्या संकेतस्थळावरून प्राप्त करून त्यामध्ये दर भरावीत तसेच त्यासोबत प्रपत्र-२ पूर्ण भरून आधार कार्डची छायांकित प्रत जोडावे)

६) निरुपयोगी जडवस्तू व किरकोळ साठा खरेदीदारास (ज्याचे स्पर्धात्मक दर मंजूर केल्या जातील त्यास) संपूर्ण रक्कम जमा केल्याशिवाय अवजड वस्तू साठा ताब्यात दिल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी. संपूर्ण रकमेचा भरणा केल्याची पावती कार्यालया मार्फत त्वरित दिल्या जाईल. ज्या लिलावधारकाची लॉट नुसार सर्वात जास्त रक्कम राहील त्या लिलावधारकास विभाग निहाय एकत्रित रक्कम डिमांड ड्राफ्ट च्या स्वरुपात दि. **२७/०३/२०२६ पूर्वी / रोजी** पर्यंत या कार्यालयास जमा करावी लागेल.

७) या कार्यालया तर्फे वाहन सुविधा, वाहनामध्ये जडवस्तू व किरकोळ साठा भरणा करणे करीता मजूर इत्यादी सुविधा पुरविण्यात येणार नाही. ज्या लिलावधारकांचे दर मंजूर झालेत त्या लिलावधारकास साहित्याची उचल म.प्रा.प्र., वणी रंभापुर कार्यालय परिसरा मधून तर काही साहित्याची उचल संबंधित विभागा वरून स्वखर्चाने कार्यालयीन वेळेत करावी लागेल.

८) दर पत्रक सादर करावयाचा नमुना (प्रपत्र-१) सोबत जोडण्यात आलेला आहे, फक्त त्याच नमुन्यामध्ये जडवस्तू साठा खरेदी बाबतचे **विभागनिहाय साहित्याचे / वस्तूचे (ढिगाऱ्या नुसार) एकत्रित दर तसेच ज्या ठिकाणी स्वतंत्र साहित्य नमूद केलेले आहे अशा ठिकाणी स्वतंत्र दर** भरून अधिकृत स्वाक्षरीसह, नाव व पत्ता तसेच आधार कार्ड क्रमांक ई. सह मोहरबंद लिफाफ्यात विहित मुदतीच्या आत (वर निर्देशित केल्या प्रमाणे) दर पत्रक सादर करणे अनिवार्य आहे. उशिरा प्राप्त होणाऱ्या दर पत्रकांचा कुठल्याही प्रकारचा विचार होणार नाही.

९) ज्या लिलावधारकाची बंद लिफाफ्यातील उच्चतम दर मंजूर झाल्या नंतर सदर साहित्याची उचल करण्याची तसेच त्यावरील देखरेखेची जबाबदार संबंधिताची राहणार. तसेच मंजूर दराची संपूर्ण रक्कमेचा भरणा डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात केल्या नंतरच सात दिवसाच्या आत सदर साहित्याची उचल करण्यास अनुमती देण्यात येईल. लिलावधारकाने सदर वस्तू उचल करण्यास नकार दिल्यास अनामत रक्कम परत दिल्या जाणार नाही.

१०) सदर प्रक्रीये बाबत दरपत्रक सादर कर्त्यास कुठल्याही प्रकारचा आक्षेप अथवा तक्रार असल्यास दर पत्रक सादर करण्याच्या दिनांका पुर्वी किंवा प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी त्याच दिवशी सादर करावा. एकदा समितीची कार्यप्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कुठल्याच प्रकारचा आक्षेप / तक्रार किंवा दावा या कार्यालया मार्फत विचारत घेतल्या जाणार नाही.

११) जडवस्तू व किरकोळ विक्री लिलावा बाबत अपेक्षित दर प्राप्त नझाल्यास सदर जडवस्तू व किरकोळ साठा लिलाव अंशात विक्री, पूर्णता विक्री करणे किंवा संपूर्ण लिलाव प्रक्रिया रद्द करणे बाबतचे अधिकार मुख्य बिज उत्पादन अधिकारी, मध्यवर्ती प्रात्येक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापुर तथा लिलाव समिती यांनी राखून ठेवले आहे. त्याबाबत कोणतीही तक्रार ग्राह्य धरण्यात येणार नाही.

१२) संबधित दरपत्रक सादरकर्त्यास वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्या बाबतचे स्वतंत्र प्रमाणपत्र (प्रपत्र-२ नुसार) लिफाफ्यात नाव, स्वाक्षरी व आधार कार्ड प्रतसह सादर करणे आवश्यक आहे.

मुख्य बिजोत्पादन अधिकारी
मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# प्रपत्र- १

## <u>दर पत्रक नमुना</u>

प्रती,

मा. मुख्य बिजोत्पादन अधिकारी
मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

**विषय: मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर अंतर्गत निरुपोयोगी जड़वस्तू व किरकोळ विविध साहित्याची विक्री करिता मोहर बंद दर पत्रक सादर करणे बाबत.**

**संदर्भ:** विद्यापीठ जाहिरात क्र......... दि..................पेपरचे नाव....................................... किंवा विद्यापीठ संकेतस्थळ प्रसिद्धी ई. नुसार

महोदय,

मी खालील सही करणार वरील सदर्भीय विषयानुसार निरुपोयोगी जड़वस्तू व किरकोळ विविध साहित्याच्या खरेदीच्या अनुषंगाने लिलावात सहभागी होण्याकरिता खालील प्रमाणे दर सादर करीत आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | लॉट क्र. | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १. | कुरणखेड विभाग | १ | |
| | | २ | |
| २. | वणी विभाग | १ | |
| ३. | निपाणा विभाग | १ | |
| | | २ | |
| ४. | पहाडपुर विभाग | १ | |
| | | २ | |
| ५. | राजापूर विभाग | १ | |
| | | २ | |
| ६. | अन्वी विभाग | १ | |
| | | २ | |
| ७. | सुकळी विभाग | १ | |
| ८. | तामशी विभाग | १ | |
| ९. | कोठारी विभाग | १ | |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | काटेपुर्णा विभाग | १ | |
| ११. | ताणखेड विभाग | १ | |
| १२. | मिर्झापूर विभाग | १ | |
| | | २ | |
| १३. | ढगा विभाग | १ | |
| १४. | पैलपाडा विभाग | १ | |
| | | २ | |
| १५. | विकास विभाग (Development section) | १ | |
| | | २ | |
| १६. | कर्मशाळा विभाग (Workshop section) | १ | |
| | | २ | |
| | | ३ | |
| | | ४ | |
| | | ५ | |
| | | ६ | |
| | | ७ | |
| | | ८ | |
| | | ९ | |
| १७. | भांडार विभाग (Central store section) | १ | |
| | | २ | |
| | | ३ | |
| | | ४ | |
| | | ५ | |
| | | ६ | |
| | | ७ | |
| १८. | Large Farm Demonstration (LFD) | १ | |
| | | २ | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ३ | |
| | | ४ | |
| | | ५ | |
| १९. | रंभापुर विभाग | १ | |

स्वाक्षरी: ................................

नाव: ..........................................

<u>प्रपत्र- २</u>

# प्रमाणपत्र

मी खालील दरपत्रक सादरकर्ता श्री ........................................................................................ या द्वारे प्रमाणित करतो कि, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला मार्फत बंद लिफाफा लिलाव प्रक्रिया मध्ये कोणाच्याही दबावाखाली न राहता स्वमर्जीने सहभागी होत आहे. तसेच लिलावा करिता नेमून दिलेल्या सर्व अटी व शर्ती (अ. क्र.१ ते. ११२) मला मान्य असुन त्याच्या अधीन राहून मी सदरच्या बंद लिफाफा लिलाव प्रक्रीये मध्ये दर सादर करीत आहे.

तसेच, दर सादर करण्यापूर्वी मी स्वतः सर्व साहित्याची प्रत्यक्ष पाहणी करून व सर्व अटी व शर्तीचे अवलोकन करून दर सादर केलेले आहेत व त्याबाबत मला कुठल्याही प्रकारचा आक्षेप अथवा दावा राहणार नाही याची मी खात्री देतो.

स्वाक्षरी: ................................

दर पत्रक सादर करणाऱ्याचे नाव: ..................................

पत्ता: ..........................................................................

..........................................................................

आधार क्र. (सोबत प्रत) .................................................

मो.क्र. ..........................................................................